# हवामान आधारीत कृषि सल्ला
## ग्रामिण कृषि मौसम सेवा, ए.एम.एफ.यु., इगतपुरी,
## विभागीय कृषी संशोधन केंद्र, इगतपुरी, जि. नाशिक.

दूरध्वनी : ०२५५३ २४४०३२ ईमेल: igatpuri.amfu@gmail.com

**५५) हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि. ०८.१०.२०२४**

**जिल्हा : नाशिक**

| मागील आठवड्यातील हवामान (०२/१०/२०२४ ते ०८/१०/२०२४) | | | | | | | हवामान घटक | पुढील पाच दिवसांचा हवामान अंदाज (०९/१०/२०२४ ते १३/१०/२०२४) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०२ | ०३ | ०४ | ०५ | ०६ | ०७ | ०८ | दिनांक | ०९ | १० | ११ | १२ | १३ |
| ०.० | ०.६ | ०.० | ०.० | ०.० | ३.५ | ०.० | पाऊस (मिमी) | ८ | ७ | १५ | १० | ३ |
| ३१.५ | ३०.५ | ३०.९ | २९.८ | ३०.३ | ३०.० | ३२.२ | कमाल तापमान (अं.से.) | ३३ | ३३ | ३४ | ३४ | ३४ |
| २२.० | २२.० | २२.० | २१.० | २१.५ | २०.० | २१.१ | किमान तापमान (अं.से.) | २२ | २२ | २३ | २३ | २३ |
| अ:ढगाळ | अ:ढगाळ | अ:ढगाळ | अ:ढगाळ | अ:ढगाळ | अ:ढगाळ | अ:ढगाळ | ढग स्थिती (आकाश) | अ:ढगाळ | अ:ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ |
| ८४ | ८९ | ८६ | ८५ | ८६ | ८५ | ७४ | सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | ७२ | ७३ | ७६ | ७९ | ७८ |
| ७० | ७० | ६४ | ६५ | ७१ | ६० | ६२ | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | ५२ | ५७ | ५५ | ५१ | ५० |
| १.५ | २.८ | ३.२ | २.७ | ३.१ | ४.८ | ३.८ | वाऱ्याचा वेग (किमी/तास) | ९ | ६ | ११ | ८ | ११ |

**हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला**

| पीक | अवस्था | कृषि विषयक सल्ला |
|---|---|---|
| **हवामान सारांश** | | पुढील पाच दिवसाचा अंदाज लक्ष्यात घेता दि. ९ ते १३ ऑक्टोबर २०२४ दरम्यान हलका ते मध्यम पाऊस पडण्याची शक्यता आहे तसेच पाच दिवस हवामान थोडे उष्ण व दमट राहण्याची शक्यता आहे. आकाश पुढील पाच दिवस अंशतः ढगाळ ते ढगाळ राहील. तसेच कमाल तापमान ३३-३४ डिग्री सें. व किमान तापमान २२-२३ डिग्री सें. दरम्यान राहण्याची शक्यता आहे तसेच वा-याचा वेग ६-११ कि.मी/तास या दरम्यान राहण्याची शक्यता आहे. |
| **हवामान सतर्कता / इशारा:** | | हवामानाचा अंदाज आणि इशारा लक्षात घेता नाशिक जिल्ह्यात काही ठिकाणी दि. ०८ व १० ऑक्टोबर २०२४ रोजी **(येलोअलर्ट)** मेघगर्जनेसह विजांचा कडकडाट, हलका ते मध्यम पाऊस आणि सोसाट्याचा वारा (३० - ४० किमी प्रति तास वेग) वाहण्याची शक्यता परिस्थीच्या अनुषंगाने कृषी क्षेत्रावर पडणाऱ्या प्रभावा आधारित अंदाज **(०८.१०.२०२४ रोजी आर एम सी मुंबईव्दारे जारी केलेल्या जिल्हास्तरीय अंदाज आणि चेतावणीवर आधारित)** |
| **सामान्य सल्ला** | | **हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला व हवामानचा पूर्वानुमानाकरीता मेघदुत व मेघगर्जनेसह पाऊस साठी दामिनी मोबाईल ॲपचा उपयोग करावा.**<br>मुगाच्या शेंगा खव्यावर चांगल्या वाळल्यावर मळणी करावी.<br>उडीद: शेंगा खव्यावर चांगल्या वाळविल्यावर काठीच्या सहाय्याने झोडपून दाणे वेगळे करावेत. साठवणीपुर्वी उडीद ५ ते ६ दिवस उन्हात वाळवुन पोत्यात किंवा कोठीत साठवावे. साठवण कोंदट किंवा ओलसर जागेत करू नये. शक्य झाल्यास धान्यास १ टक्का करंज किंवा एरंडीचे तेल चोळावे किंवा कडुनिंबाचा पाला (५ टक्के) धान्यात मिसळून धान्य साठवावे. यामुळे धान्य साठवणुकीतील किडींपासून उडीदाचे संरक्षण होते.<br>खरीप हंगामातील वांगी, मिरची, टोमॅटो काढणी करवी.<br>कोबी व फ्लॉवर पिकाची काढणी करावी.<br>वेलवर्गीय भाजीपाला पिकाची काढणी करावी.<br>भेंडी व गवार पिकाची काढणी करावी.<br>सर्व खरीप भाजीपाला पिकांवरील कीड व रोगाचे नियंत्रणाचे उपाय करावेत. |
| **संदेश** | | **इशारा लक्ष्यात (दि. ०८ व १० ऑक्टोबर २०२४) घेता पशुधन, कुक्कुट पक्षी आणि स्वतःचे मेघगर्जनेसह विजांच्या कडकडाटपासून संरक्षण करा तसेच हलका ते मध्यम पाऊस असल्याकारणाने कापणी व मळणी केलेल्या खरीप पिकांना सुरक्षित जागेवर झाकून ठेवावे.** |
| **खरीप भात** | **फुलोरा ते चिक भरण्याची अवस्था / लोंबी वाढीची अवस्था** | भात सदृश्य तणाची भेसळ फुलोऱ्यावर येताच लगेच काढावी जेणेकरून त्याचे दाणे खडून इतर स्वच्छ भात प्रक्षेत्रावर होणारा प्रसार थांबवता येईल.<br>सतत पडणाऱ्या पावसामुळे भात पिकावर कडा करपा रोगाचा प्रादुर्भाव दिसून येत आहे. रोगाच्या नियंत्रणासाठी कॉपर ऑक्सीक्लोराईड (सी.ओ.सी.) ३० ग्रॅम + स्ट्रिप्टोमाइसिन ६ ग्रॅम प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.<br>भात पिकावरील करपा रोगाच्या नियंत्रणासाठी प्रोपीकोनॅझोल १ मिली किंवा कार्बेन्डाझिम १ ग्रॅम प्रति लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. फवारणी द्रावणात स्टिकर ०.१ % (चिकटद्राव्य, १ मिली/ ग्रॅम प्रती लीटर) मिसळून फवारणी करावी.<br>खाचरात रोपांच्या फुलोरा ते चिक भरणेच्या अवस्थतेत पाण्याची पातळी ५ ते १० सेमी असावी.<br>भात खाचरात लोंबी निर्मितीच्या अवस्थतेत १५ सेमी पाण्याची पातळी नियंत्रित ठेवावी. |

दूरध्वनी : ०२५५३ २४४०३२ ईमेल: igatpuri.amfu@gmail.com


| | | |
|---|---|---|
| **नाचणी** | **फुलोरा ते चिक भरण्याची अवस्था** | नाचणी पीक पावसाच्या पाण्यावर घेतले जाते. पुढील पाच दिवसाचा अंदाज लक्ष्यात घेता पावसामध्ये खंड पडण्याची शक्यता पाहता उपलब्धतेनुसार संरक्षित पाणी द्यावे.<br>नाचणी पिकातील भेसळ फुलोऱ्यावर येताच लगेच काढावी. |
| **खुरासणी** | **फुलोऱ्याची अवस्था** | जर खुरासणी पिक फुलोरा अवस्थेत असेल तर कीटकनाशकाची फवारणी करू नये.<br>खुरासणी पिकाचे अधिक उत्पादन घेण्यासाठी, खुरासणी पिकात कीटक परागीभवन घडवण्याकरिता एक मधमाश्यांचे कृत्रिम पोळे प्रति एकरसाठी वापरण्याचे शिफारस करण्यात आली आहे. |
| **खरीप बाजरी** | **काढणी** | परिपक्व झालेल्या खरीप बाजरा पिकाची कापणी पूर्ण करून घ्यावी. त्यासाठी ताटाची कणसे विळ्याने कापून गोळा करावीत व वाळवून मळणी करावी.<br>खरीप बाजरा पिकाची मळणी यंत्राच्या सहय्याने लवकरात लवकर करावी. |
| **खरीप मका** | **काढणी** | परिपक्व झालेल्या खरीप मका पिकाची कापणी पूर्ण करून घ्यावी. त्यासाठी कणसे पिवळसर, दाणे कडक झाल्यानंतर कणसे खुडून काढावीत. ही कणसे दोन ते तीन दिवस उन्हात चांगली वाळवावीत. त्यानंतर कणसाच्या वरील आवरण काढून मका सोलणी यंत्राच्या (म.फु.कृ.वि. राहुरीद्वारे विकसित सुधारित अवजार) साह्याने कणसातील दाणे वेगळे करावेत. दाण्यांतील पांढरी तुसे, बिट्ट्याचे तुकडे वेगळे करण्यासाठी उफनणी करावी. दाणे चांगले उन्हात वाळवून दाण्यांतील आर्द्रता १२ टक्क्यांपर्यंत ठेऊन साठवण करावी. |
| **सोयाबीन** | **पक्वतेची अवस्था / काढणी** | लवकर पक्व होणाऱ्या वाणांची काढणी<br>सोयाबीनच्या लवकर पक्व होणाऱ्या वाणांमध्ये ९० टक्के शेंगा पिवळ्या पडल्यावर पिकाची काढणी केली जाऊ शकते. यामुळे बियाणे अंकुरणावर विपरीत परिणाम होत नाही.<br>ज्या ठिकाणी पीक परिपक्व झाले आहे, तिथे सततच्या पावसामुळे सोयाबीनच्या गुणवत्तेमध्ये घट येऊ शकते. शेंगांमध्ये दाणे अंकुरित होण्याचीही शक्यता असते. अशा वेळी पिकाची योग्यवेळी काढणी करावी, जेणेकरून शेंगा तडकण्यामुळे अथवा दाणे अंकुरित होण्यामुळे होणारे नुकसान टाळता येईल<br>पीक पक्वतेनंतर पिकाची काढणी व मळणी करावी. विळ्याने कापणी करून झाडे गोळा करून, प्रखर सूर्य प्रकाशात अथवा पावसापासून सुरक्षित जागी वाळवून, मळणीसाठी खळ्यावर ढीग करून झाकून ठेवावा. मळणी करताना मळणी मशीनच्या शाफ्टची गती ३०० ते ४०० आरपीएम असावी. म्हणजे सोयाबीनच्या उगवणक्षमतेवर अनिष्ट परिणाम होणार नाही. |
| **कापूस** | **बोंडे लागण ते बोंडे पक्वतेची अवस्था** | कापुस पिकावरील गुलाबी बोंड अळीच्या नियंत्रणासाठी या पंधरवड्यात २ कामगंध सापळे प्रति एकर पिकांच्या उंचीच्या १ फुट उंचीवर लावावे. फुलोरा अवस्थेतेतील पिकांवर ५ % निंबोळी अर्काची फवारणी करावी. तसेच थायोडीकार्ब ७५ डब्ल्यू पी २० ग्रॅम किंवा क्विनॉलफॉस २० ईसी २५ मिली किंवा प्रोफेनोफॉस ५० ईसी २० मिली प्रति १० लिटर पाण्यातून फवारणी करावी.<br><u>पाते व बोंड गळ कारणे</u><br>जास्त किंवा कमी झालेला पाऊस किंवा तापमानामध्ये झालेला चढ-उतार<br>वाढीच्या अवस्थेत अन्नद्रव्यांसाठी होणारी पिकाची स्पर्धा<br>किडींचा प्रादुर्भाव<br>शेतात पाणी साचून राहणे किंवा जमिनीतील ओलावा कमी होणे<br>सूर्यप्रकाशासाठी होणारी पिकाची स्पर्धा<br><u>उपाययोजना</u><br>आपत्कालीन परिस्थितीत योग्य अन्नद्रव्ये व पाणी व्यवस्थापन करणे.<br>एकात्मिक अन्नद्रव्ये व्यवस्थापन करणे.<br>नॅप्थील ॲसेटिक ॲसिड (एन.ए.ए.) २० पी.पी.एम. प्रमाणात फवारणी करणे.<br>वाढ नियंत्रण व शेंडा खुडणी करणे.<br>पोटॅशियम नायट्रेटची १ टक्के प्रमाणे फवारणी करणे.<br>पिकात हवा व सूर्यप्रकाश मुबलक राहील असे व्यवस्थापन करणे.<br>पिकातील २० ते ३० टक्के बोंडे फुटल्यानंतर पहिली वेचणी करून घ्यावी. त्यानंतर १५ ते २० दिवसांच्या अंतराने अनुक्रमे दुसरी व तिसरी वेचणी करावी.<br>कापूस वेचणी आटोपल्यानंतर सर्व पऱ्हाट्या उपटून शेताबाहेर न्याव्यात व त्याचा कंपोस्ट खत तयार करण्यासाठी वापर करावा. जेणेकरून किडींच्या अवस्था नष्ट होतील. |
| **भुईमुग** | **शेंगा लागणे ते पक्वतेची अवस्था / काढणी** | परिपक्व झालेल्या भुईमुग पिकाची लवकरात लवकर काढणी करून घ्यावी.<br>भुईमुग काढणी करतेवेळी जमिनीत पुरेसा ओलावा किंवा वाफसा स्थिती असल्यास वेली शेंगासह उपटून काढणी करता येते. मात्र, जमीन कडक झाली असल्यास बैलचलित (पास) किंवा ट्रॅक्टरचलित (भुईमुग काढणी यंत्र) अवजारांचा वापर करता येतो. |

**दूरध्वनी : ०२५५३ २४४०३२** **ईमेल: igatpuri.amfu@gmail.com**

| | | |
|---|---|---|
| **हरभरा** | | कोरडवाहू क्षेत्रामध्ये जेथे सिंचनाची सोय अजिबात नसेल तेथे २० सप्टेंबर ते १० ऑक्टोबर दरम्यान जमिनीतील ओल कमी होण्यापूर्वी पेरणी करावी. यासाठी प्रामुख्याने विजय, दिग्विजय फुले विक्रम आणि फुले विश्वराज हे वाण वापरावेत. बागायती हरभरा पिकाची पेरणी २० ऑक्टोबर ते १० नोव्हेंबर दरम्यान केल्यास चांगले उत्पादन येते. काबुली हरभऱ्याची पेरणी सिंचनाची सोय असेल तरच करावी. देशी हरभऱ्यामध्ये विजय, विशाल, दिग्विजय, फुले विक्रम आणि फुले विश्वराज हे वाण मर रोग प्रतिकारक्षम असून, जिरायत, बागायत तसेच उशिरा पेरणीस योग्य आहेत आणि काबुली हरभऱ्यामध्ये विराट, पीकेव्ही-२ (काक-२), पीकेव्ही-४ आणि कृपा हे वाण अधिक उत्पादन देणारे आहेत.<br>पेरणीपूर्वी एक किग्रॅ बियाण्यास २ ग्रॅम बाविस्टीन + २ ग्रॅम थायरम आणि २५ ग्रॅम रायझोबियम जीवाणू संवर्धन गुळाच्या थंड द्रावणाद्वारे चोळून बीजप्रक्रिया करावी. |
| **द्राक्षे** | | <u>घडकुज व डाऊनी मिल्ड्यूची समस्या</u><br>बऱ्याच बागेत छाटणीनंतर प्री-ब्लूम अवस्थेत घडकुज व डाऊनी मिल्ड्यूची समस्या दिसून येते. फळछाटणीनंतर बागेत आपण वेलीच्या प्रत्येक काडीवर साधारण चार ते पाच डोळ्यांवर हायड्रोजन सायनामाइडचे पेस्टिंग करतो. इथेफॉनचा वापर केल्यामुळे डोळे चांगले फुगलेले असतात. त्यामुळे सर्वच डोळे फुटून निघतात. यानंतर घड पाच पानांच्या अवस्थेत स्पष्टपणे दिसून येतो. ही अवस्था फळछाटणीनंतर साधारणपणे चौदाव्या दिवसानंतर दिसून येते. या कालावधीत फेलफुटी काढण्याला प्राधान्य दिले जाते. वाढीच्या या अवस्थेत पाऊस जास्त प्रमाणात झालेला असल्यास बागेत अचानक आर्द्रता वाढते. प्री-ब्लूम घड अवस्थेत पाऊस झाल्यास या छोट्याशा कॅनॉपीमध्ये आर्द्रता वाढू शकते. दोन ओळींमध्ये असलेली मुळे पाऊस झाल्यामुळे कार्यरत होतात. मुळांद्वारे ऑक्झिन्सची उत्पत्ती जास्त होत असल्यामुळे वेलीमध्ये अंतर्गत जिबरेलिन तितक्याच प्रमाणात वाढू लागते. परिणामी, पानांची लवचिकता वाढून वेल अशक्त होतात. प्री-ब्लूम किंवा दोडा अवस्थेत असलेल्या घडांवर पाण्याचे थेंब साचून राहिल्यास कुजेला बळी पडतात. बऱ्याचदा रात्री झालेल्या पावसानंतर सकाळी बागेत संपूर्ण घड कुजलेले दिसू शकतात.<br>बऱ्याच बागेत पावसाळी वातावरणात गवतही जास्त वाढते. पाऊस झाल्यानंतर या गवतामुळे जमिनीवरील भागात आर्द्रता जास्त काळ टिकून राहते. ओलांडा ते जमीन हे अंतर कमी असते. ढगाळ वातावरणात हवाही खेळती राहत नाहीत. या दोन्ही गोष्टींमुळे आर्द्रता अधिकच वाढते. हे डाऊनी मिल्ड्यूच्या प्रादुर्भावासाठी पोषक ठरते. ही परिस्थिती दाट कॅनॉपी असलेल्या ठिकाणी हमखास दिसून येते. कुज आणि डाऊनीचा प्रादुर्भाव कमी करण्यासाठी कॅनॉपीवर लक्ष देणे आवश्यक आहे. यावर पुढील उपाययोजना महत्त्वाच्या ठरतील:<br>घड स्पष्टपणे दिसताच फेलफुटी त्वरित काढून घ्याव्यात.<br>वेलीवर झिंक आणि बोरॉन प्रत्येकी ०.५ ग्रॅम प्रतिलिटर पाणी याप्रमाणे फवारणी करून घ्यावी.<br>पालाश (०-०-५०) १ ग्रॅम प्रतिलिटर पाणी याप्रमाणे फवारणी करून घ्यावी. यामुळे वेल सशक्त होण्यास मदत होईल.<br>एखादे सायटोकायनीनयुक्त संजीवक कमी प्रमाणात फवारून घ्यावे.<br>पाऊस जास्त झालेल्या परिस्थितीत ओलांडा किंवा खोडावर चाकूने जखम करावी. त्यामुळे सायटोकायनीनची पातळी वाढण्यास मदत होते. |
| **डाळिंब** | | <u>हस्त बहर</u><br><u>रोग व्यवस्थापन</u><br>पानगळीनंतर लगेच ताज्या तयार केलेल्या १ टक्का बोर्डो मिश्रणाची एक फवारणी करावी.<br>सॅलिसिलिक ॲसिड ०.३ ग्रॅम आणि सूक्ष्म अन्नद्रव्य मिश्रणाची २ ग्रॅम प्रति लिटर पाणी याप्रमाणे फुलधारणेपूर्वीपासून एक महिन्याच्या अंतराने प्रत्येकी चार फवारण्या कराव्या.<br>बोर्डो मिश्रण ०.५ टक्का किंवा कॉपर ऑक्सीक्लोराइड (५० डब्ल्यूपी) २.५ ग्रॅम किंवा कॉपर हायड्रॉक्साइड (५३.८ डीएफ) १.५-२ ग्रॅम अधिक स्टीकर स्प्रेडर ०.५ मिली प्रति लिटर पाणी: या व्यतिरिक्त २-ब्रोमो, २-नायट्रोप्रोपेन-१, ३ डायोल (ब्रोनोपॉल ९५.८ डीएफ) ०.५ ग्रॅम प्रति लिटर पाणी याप्रमाणे १० दिवसांच्या अंतराने फवारावे.<br>जर बागेत आधीपासूनच तेलकट डागाचा प्रादुर्भाव असेल, तर कासुगामायसिन २ मिली प्रति लिटर पाणी हे महिन्यातून एकदा आणि ७-१० दिवसांच्या अंतराने ब्रोनोपॉल फवारावे.<br>गरजेपेक्षा अधिक फवारण्या टाळाव्यात. जर पाऊस झाला असेल, तर लगेचच कासुगामायसिन + कॉपरजन्य बुरशीनाशकाची फवारणी करावी.<br>बागेमधील बुरशीजन्य रोगांच्या प्रादुर्भावानुसार कॉपरजन्य बुरशीनाशके बदलून योग्य बुरशीनाशके वापरावीत. |

दूरध्वनी : ०२५५३ २४४०३२ ईमेल: igatpuri.amfu@gmail.com


| | | |
|---|---|---|
| **आंबा** | | <u>जुन्या आंबा बागेचे पुनरुज्जीवन</u><br><u>छाटणीनंतर घ्यावयाची काळजी</u><br>कापलेल्या फांद्या ताबडतोब गोळा करून बागेबाहेर काढून बाग स्वच्छ करावी. छाटणी पूर्ण झाल्यावर कापलेल्या फांद्यांवर तसेच पूर्ण खोडावर क्लोरपायरीफॉस ५ मि.ली. प्रतिलिटर पाण्यात मिसळून फवारावे. कापलेल्या भागावर ब्रशाच्या सहाय्याने कार्बेन्डाझिम १० ग्रॅम प्रतिलिटर याप्रमाणे लावावे. छाटणी केलेल्या झाडाला १५० ते २०० लिटर पाणी १० ते १५ दिवसांच्या अंतराने दोन ते तीनवेळा द्यावे. |
| **कांदा (रांगडा कांदा)** | | कांदा पीक एक महिन्याचे झाल्यावर नत्र खताचा पहिला हफ्ता द्यावा.<br>कांदा पिकातील तण नियंत्रणासाठी लागवडीपासून २१ दिवसांनी रासायनिक तणनाशकाची फवारणी करावी. फवारणीवेळी शेतामध्ये वापसा स्थिती असावी याची काळजी घ्यावी. |
| **टोमॅटो** | | <u>रब्बी टोमॅटो रोपवाटिका</u><br>रब्बी हंगामात सप्टेंबर ते ऑक्टोबर या कालावधीत रोपवाटिकेमध्ये रोपे तयार करून ऑक्टोबर ते नोव्हेंबर महिन्यात पुनर्लागवड केली जाते. साधारणपणे सरळ वाणांसाठी १६० ग्रॅम व संकरित वाणांसाठी ५० ग्रॅम बियाणे प्रति एकरसाठी पुरेसे होते. थायरम किंवा कॅप्टन ३ ग्रॅम किंवा ट्रायकोडर्मा २.५ ग्रॅम प्रतिकिलो बियाणे चोळावे. त्यानंतर ॲझोटोबॅक्टर २.५ ग्रॅम प्रतिकिलो बियाण्यास चोळावे. साधारणपणे १ एकर क्षेत्रावर लागवडीसाठी १.२ गुंठ्यांची रोपवाटिका पुरेशी असते. रोपवाटिकेची जमीन उभी-आडवी चांगली नांगरून कुळवाच्या दोन पाळ्या द्याव्यात. त्यानंतर ३ मीटर लांब, १ मीटर रुंद आणि १५ सें.मी. उंचीचे गादीवाफे तयार करावेत. गादीवाफ्यांमध्ये ५ किलो चांगले कुजलेले शेणखत, ८० ग्रॅम १९:१९:१९ किंवा १०० ग्रॅम १५:१५:१५ आणि २०० ग्रॅम निंबोळी पेंड चांगली मिसळावी. सोबत ट्रायकोडर्मा ५० ग्रॅम एकसारखे मिसळून घ्यावे. जेणेकरून रोपवाटिकेमध्ये मर रोगाचा प्रादुर्भाव टाळला जाईल. गादीवाफ्यावर हाताने किंवा खुरप्याच्या साह्याने १० सें.मी. अंतरावर रेषा ओढून त्यामध्ये १ सें.मी. अंतरावर बी पेरावे. लगेच बी मातीने झाकून झारीने हलके पाणी द्यावे. साधारण ५ ते ८ दिवसांत बी उगवते. बी उगवेपर्यंत झारीने पाणी द्यावे. नंतर जमिनीच्या मगदुरानुसार पाटाने पाणी द्यावे. पाणी साचून राहणार नाही याची काळजी घ्यावी. रोपे उगवल्यानंतर ६०-१०० मेश नायलॉन नेट किंवा पांढरे पातळ कापड २ मीटर उंचीपर्यंत मच्छरदाणी प्रमाणे गादीवाफ्यावर लावून रोपे झाकून घ्यावीत. रोपे २५ ते ३० दिवसांत पुनर्लागवडीसाठी तयार होतात. |
| **पशुधन (गाय, म्हैस इ.)** | | या महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात आंतरकृमी व बाह्य परोपजीविंचा नायनाट करण्यासाठी बहुप्रभावी जंतनाशक औषध पशुवैद्यकाच्या सहाय्याने द्यावे.<br>उर्जा व प्रथिनेयुक्त पशु आहाराचा समावेश करून पशु आहार वाढवावा.<br>थंडीची सुरुवात होऊन श्वसनाचे आजार संभावण्याची शक्यता असते त्यामुळे विशेषतः लहान वासरांची काळजी ग्यावी.<br>हलका ते मध्यम पाऊस व विजांपासून पशुधनाचे संरक्षण करावे व त्यांना चारण्यास किंवा इतर कारणास्तव बाहेर नेण्यास टाळावे.<br>जनावरांचा गोठा कोरडा ठेवण्यासाठी चुन्याचा वापर करावा.<br>प्राण्यांना ट्रॅक्टर आणि इतर धातूंच्या शेतीच्या उपकरणांपासून दूर ठेवा.<br>आपल्या प्राण्यांना झाडाखाली जमू देऊ नका. प्राण्यांकडे लक्ष्य ठेवा आणि त्यांना आपल्या थेट नियंत्रणाखाली ठेवण्याचा प्रयत्न करा<br>गुरे व शेळ्यांना शेडमध्ये ठेवा आणि त्यांना विजांचा कडकडाट पासून  वाचवण्यासाठी प्राण्यांना खुले पाणी, तलाव किंवा नदीपासून दूर ठेवा.<br>पावसापासून पशुधन व कुक्कुटपक्ष्यांचे साठवलेले पशुखाद्य, चारा व कडबायाचे प्लास्टिक/ ताडपत्रीने झाकून संरक्षण करावे.<br>दुभत्या जनावरांना गोठ्यात ठेवा |
| **शेळ्या** | | <u>सप्टेंबर व ऑक्टोबरमधील शेळ्यांतील व्यवस्थापन</u><br>माज ओळखणारा बोकड गोठ्यापासून वेगळा व दूर ठेवावा.<br>पैदाशीच्या योग्य नोंदी ठेवाव्यात.<br>पैदाशीच्या माद्यांमध्ये परजीवींचे प्रमाण तपासावे व आवश्यकतेनुसार जंत निर्मूलन करावे.<br>शेळ्यांचे वाढलेले खूर कापून घ्यावेत. |

**दूरध्वनी : ०२५५३ २४४०३२** **ईमेल: igatpuri.amfu@gmail.com**

| | | |
|---|---|---|
| **मेंढ्या** | | <u>ऑक्टोबरमधील मेंढ्यांतील व्यवस्थापन</u><br>लेंडी नमुने तपासून जंताचे औषध द्यावे.<br>पैदासीकरिता निरुपयोगी असलेल्या नरांचे खच्चीकरण करावे.<br>मेंढ्यांचे वाड्यामधील मातीचा थर बदलावा.<br>बाह्यकीटक प्रतिबंधाकरिता गोचिडनाशक द्रावणाने मेंढ्या धुऊन घ्याव्यात.<br>मेंढ्यांची लोकर कातरणी करण्यात यावी.<br>निरुपयोगी मेंढ्या कळपातून काढून त्यांची विक्री करण्यात यावी.<br>बदलत्या वातावरणापासून (मुख्यत: सकाळी व संध्याकाळी) कळपातील मेंढ्यांचे संरक्षण करावे. |
| **कुक्कुटपालन** | **आरोग्य व्यवस्थापन** | कोंबड्यांमधील ताण<br>अचानक हवामान बदलामुळे ताण येऊन रोग प्रतिकारशक्ती कमी होऊन कोंबड्या इतर रोगांना बळी पडू शकतात.<br>एका प्रकारच्या खाद्यापेक्षा वेगळे खाद्य देणे, घरगुती आहारात पुरेशा प्रमाणात पोषक तत्त्व नसणे किंवा इतर कारणांमुळे ताण येऊन कोंबड्या पुरेसे खाद्य खात नसतील तर ताण येऊ शकतो.<br>वजन वाढणे, पिसे गळणे किंवा वयात येणे यासारख्या घटना ताण निर्माण करू शकतात.<br>कोंबड्यांना पकडताना, काही औषधे देताना किंवा एका जागेतून दुसरीकडे नेताना कोंबड्यांमध्ये भावनिक ताण येतो.<br>रोग निवारणासाठी देण्यात येणाऱ्या औषधांमुळे व रोगाच्या अवधीमुळेही ताण येऊ शकतो.<br>उपाययोजना<br>कोंबड्यांमधील ताण घालविण्यासाठी किंवा कमी करण्यासाठी प्रत्येक कोंबडीला किती जागा लागते हे पाहून आपल्याजवळील उपलब्ध जागेनुसार एकूण कोंबड्यांची संख्या ठरवावी.<br>छोट्या जागेत जास्त गर्दी केल्याने वातावरणात अमोनियाचे प्रमाण वाढते. शिवाय पक्षी एकमेकांच्या जास्त जवळ असल्याने रोग आल्यास लवकर पसरतो. यावर उपाय म्हणून लिटरची स्वच्छता ठेवावी.<br>पावसाळ्यात व जास्त आर्द्रतेच्या काळात लिटर प्रयत्नपूर्वक कोरडे ठेवावे. वातावरणातील बदलांनुसार शेडमध्ये पडदे लावणे, पोती बांधणे या गोष्टींची वेळेवर काळजी घ्यावी.<br>ताण घालविणारी औषधे तज्ञांच्या सल्ल्याने द्यावीत. आहारातून किंवा पाण्यातून जीवनसत्त्वांचा पुरवठा केल्यास ताण कमी होतो.<br>ताण असताना लसीकरण करू नये. प्रथम कोंबड्यांवरील ताण कमी करून मगच लसीकरण करावे. |

**स्त्रोत**:

१) हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई.

२) मागील हवामान : ग्रामीण कृषि मौसम विभाग वेधशाळा विभागीय कृषी संशोधन केंद्र, इगतपुरी, जि. नाशिक.

**ठिकाण** : विकृसंके, इगतपुरी

**दिनांक** : ०८.१०.२०२४

**स्वाक्षरीत**
**प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे, ऐएमएफयु, इगतपुरी**
**तथा सहयोगी संशोधन संचालक,**
**वि.कृ.सं.के., इगतपुरी, जि. नाशिक**